पोलीस आयुक्तालय, नवी मुंबई

प्रेसनोट

CB 48/2026

गुन्हे शाखा, नवी मुंबई दिनांक २१/०७/२०२६

**"बनावट गुंतवणूक योजनेच्या माध्यमातून तब्बल 47 कोटीं रुपयांची फसवणूकबाबत** FIU **यूनिटची कारवाई"**

श्री.मिलींद भांरबे, पोलीस आयुक्त, श्री.दीपक साकोरे, पोलीस सह आयुक्त, श्री.प्रमोद शेवाळे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे), श्री.सचिन गुंजाळ, पोलीस उप आयुक्त, गुन्हे शाखा यांनी नवी मुंबई पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रात आर्थिक गुन्हयांना प्रतिबंध करणेकामी आर्थिक गुप्तवार्ता कक्षाला कारवाई करण्याचे आदेश दिलेले होते.

नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या FIU यूनिटकडे निनावी तक्रार प्राप्त झाली होती. मिळालेल्या माहितीचे अनुषंगाने FIU यूनिटने खात्री केली असता OSSAM SWADESH LLP या कंपनीचे पदाधिकारी व एजंट यांनी आकर्षक परताव्याचे आमिष दाखवून अनेक गुंतवणूकदारांची फसवणूक करीत आहेत. आरोपींनी कंपनीच्या माध्यमातून गुंतवणुकीवर दरमहा आकर्षक परतावा, कमिशन तसेच डायमंड गिफ्ट यांसारख्या लाभांचे आमिष दाखवून मोठ्या प्रमाणावर नागरिकांकडून पैसे स्वीकारुन सुरुवातीच्या काळात त्यांना काही रक्कम परत देऊन विश्वास संपादन केला. त्यानंतर मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक स्वीकारून परतावा देणे बंद केले आहे.

या प्रकरणी OSSAM SWADESH LLP कंपनीचे सीएमडी, सुनील पालवे, मार्केटिंग डायरेक्टर, जयदेव गंभे, आशीष बर्वे, अमोल जाधव, एजंन्ट नवनाथ रेपोळे, एजंन्ट दिनेश कोळंबे तसेच OSSAM SWADESH LLP कंपनीचे इतर प्रतिनिधी/एजंट यांच्याविरुद्ध एपीएमसी पोलीस ठाणे,गु.रजि. नं. 375/2026 बी.एन.एस.कलम 316(5), 318(4), 3(5) तसेच बेकायदेशीर ठेव योजना प्रतिबंध अधिनियम, 2019 मधील कलम 3, 5 व 6 अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. तपासात समोर आलेल्या प्राथमिक माहितीनुसार, सुमारे 4,500 गुंतवणूकदारांकडून 47 कोटीं रुपयांपेक्षा अधिक रक्कम जमा करण्यात आली असून त्यापैकी मोठ्या प्रमाणावर रक्कम अपहार झाल्याची तक्रार आहे. मुख्य आरोपी सुनील पालवे व नवनाथ रेपाळे यांना अटक करण्यात आली आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास आर्थिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री.सदाशिव निकम हे करीत आहेत.

सदरची उल्लेखनीय कामगिरी श्री.विशाल हिरे, सहायक पोलीस आयुक्त, आर्थिक गुन्हे शाखा यांचे मार्गदनाने FIU यूनिट व गुन्हे शाखेतील अधिकारी व अंमलदार यांनी केलेली आहे. आर्थिक व्यवहार, कंपनीची कागदपत्रे, बँक खात्यांचा तपशील, निधीचा प्रवाह तसेच इतर संभाव्य पीडित गुंतवणूकदारांचा शोध घेण्याचे काम सुरू आहे. या प्रकरणातील इतर फसवणूकग्रस्त नागरिकांनीही आवश्यक कागदपत्रांसह आर्थिक गुन्हे शाखेशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात येत आहे.